देशाच्या संरक्षणासाठी युध्दात लढताना जायबंदी झालेल्या जवानांचे व त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी कार्य करणा-या क्विन मेरी इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेला श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून निधी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग,

शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१९/प्र.क्र.३४/का.१६

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१९.

संदर्भ:- प्रभारी कार्यकारी अधिकारी,श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई यांचे पत्र क्र.सविगंम/१५८२/२०१९, दि.१६.०२.२०१९

प्रस्तावना :-

देशाच्या संरक्षणासाठी जायबंदी झालेल्या जवानांच्या स्वावलंबनासाठी व त्यांच्या कुटुंबाच्या पुर्नवसानाचे कार्य करणारी क्विन मेरी इन्स्टिट्यूट, पुणे ही एकमेव संस्था आहे. या संस्थेला तिच्या कार्यात सहकार्य करण्यासाठी श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५/१/२०१९ रोजीच्या सभेत रुपये २५ लक्ष इतका निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रभारी कार्यकारी अधिकारी, श्री सिध्दिविनायक गणपती न्यास,प्रभादेवी, मुंबई यांनी त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये सभेतील निर्णयानुसार रुपये २५ लक्ष इतका निधी क्विन मेरी इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेला देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती शासनास केली आहे.

देशाच्या संरक्षणासाठी जायबंदी झालेले जवान तसेच त्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यासाठी क्विन मेरी इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेला रुपये २५ लक्ष इतका निधी देण्याचा निर्णय श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर व्यवस्थापन समितीच्या सभेत घेण्यात आला. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,प्रभादेवी, मुंबई यांचेकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने क्विन मेरी इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेस रुपये २५ लक्ष इतकी रक्कम न्यासाकडून देण्यासाठी "एक विशेष बाब" म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय:-

देशाच्या संरक्षणासाठी जायबंदी झालेल्या जवानांच्या स्वावलंबनासाठी व त्यांच्या कुटुंबाच्या पुर्नवसानाचे कार्य करणा-या क्विन मेरी इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेस श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेकडून रुपये २५ लक्ष इतका निधी देण्यास " एक विशेष बाब " म्हणून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharahstra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१९०२२५१७०४१०४३१२ असा आहे. हा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Salunke Sunita Parag

Digitally signed by Salunke Sunita Parag
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a9ee0eef2d14d407f36dd3610d7d17b19cc85c5da3c6493dd1b6379b15e3372e, serialNumber=8f3e3dd76ae275cc1afa0c0be4edf609c0420709b30d7478f9b8cff1b4acde7d, cn=Salunke Sunita Parag
Date: 2019.02.25 17:06:24 +05'30'

(सु.प.साळुंके)

कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग.

प्रति:-
१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा.राज्यमंत्री, विधि व न्याय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा अध्यक्ष, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.
४) कार्यकारी अधिकारी, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.
५) निवड नस्ती/का.१६